रजिस्टर पोष्टाने

जिल्हा परिषद सरळसेवा पदभरती सन -२०२३ अंतर्गत कनिष्ठ सहायक (लेखा)गट-क या पदावर नियुक्ती देणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद,अर्थ विभाग,
आदेश क्र. कार्या-१/आस्था-१/ ३९६/२०२५
अहिल्यानगर,दिनांक १७/०९/२०२५

वाचा – १. महा.शासन राजपत्र ग्रामविकास व जलसंधारण विभाग,दिनांक ३ मे २००६ अन्वये महा.जि.प.जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) (सुधारणा) नियम, १९६७ मधील परिशिष्ट अकरा (४) (ब)

२.महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,यांचेकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दिनांक ४ मे,२०२२

३.महा.शा.ग्रा.वि.विभाग,शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण२०२२/प्र.क्र.११/आस्था-८ दि.१५ मे,२०२३

४. अहमदनगर जिल्हा परिषदेकडील जाहिरात क्रमांक ०१/२०२३

५. आय.बी.पी.एस.यांचेकडून प्राप्त निकालपत्र जा.क्र.४७१८ दिनांक ०९.०२.२०२४

६. मा.अध्यक्ष,जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडील मंजूर निवड सूची दिनांक १२/०७/२०२४

७.मा.अवर सचिव,ग्रा.वि.व पं.रा.वि.यांचेकडील पत्र क्र.पदभ-४३२४/प्र.क्र.३५९/आस्था-८,दि.१३.६.२०२५

८.मा.अध्यक्ष,जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी,अहिल्यानगर यांचेकडील मंजूर अतिरिक्त निवड सूची दिनांक ०१.०९.२०२५

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ ते ३ मधील तरतूदींना व वेळोवेळी प्रसिध्द शासन निर्णय/परिपत्रके यांना अधिन राहुन अहमदनगर जिल्हा परिषदेने संदर्भ क्रमांक ४ अन्वये कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदासाठी जाहिरात प्रसिध्द केलेली होती. प्रस्तुत जाहिरातीप्रमाणे आयोजित केलेल्या विहीत परीक्षांबाबत संदर्भ क्रमांक ५ नुसार निकालपत्र प्राप्त झालेले आहे. प्राप्त निकालपत्रातील गुणवत्ता यादीनुसार संदर्भ क्रमांक ८ अन्वये आपले नांव अतिरिक्त निवडसूचीमध्ये समाविष्ट झालेले आहे. त्यानुसार आपण उपलब्ध करुन दिलेप्रमाणे मुळ कागदपत्रांची या कार्यालयाने पडताळणी केलेली आहे.

**श्रीमती दिक्षा सिध्दार्थ तेलतुंबडे** हे म.जि.प.जि.से. (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट अकरा (४) मधील तरतुदीनुसार कनिष्ठ सहाय्यक (लेखा) या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करीत असल्याने ते कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट-क या पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरत आहेत. त्यानुसार संदर्भ क्रमांक ८ मधील मंजूर अतिरिक्त निवडसूचीप्रमाणे व संदर्भिय शासन निर्णयामधील निर्देशानुसार मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर **श्रीमती दिक्षा सिध्दार्थ तेलतुंबडे** यांना पुढे नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहुन जिल्हा सेवेतील **कनिष्ठ सहायक (लेखा) गट क** म्हणुन वेतनबॅन्ड **रु. १९९००-६३२०० (एस-६) (अधिक प्रचलित नियमानुसार मिळणारा महागाई भत्ता व इतर भत्ते)** मध्ये खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या नुसार व स्तंभ ६ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपाची नेमणुक देण्यात येत आहे.

| अ.क्र | उमेदवाराचे नांव | पत्ता | मुळ प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्रीमती दिक्षा सिध्दार्थ तेलतुंबडे | c/o ताराचंद गझलवार,सुनिता बिल्डिंग जवळ, संकटमोचन रोड,यवतमाळ ता.जि.यवतमाळ पीन.४४५००१ | अनु. जाती | अनु.जाती (महिला राखीव) | पंचायत समिती राहुरी, ता.राहुरी जि.अहिल्यानगर |

**नेमणुकीबाबतच्या अटी व शर्ती –**

१. **कनिष्ठ सहायक (लेखा)** गट क या पदावर केलेली नेमणूक पूर्णतः हंगामी स्वरुपाची असुन कोणत्याही प्रकारची पूर्वसुचना व कारण न दाखविता जिल्हा परिषद सेवेतुन कमी करण्याचा हक्क राखुन ठेवलेला आहे,तसेच सदर नेमणुकीमुळे त्यांना यापुढे शासकिय नेमणुकीसाठी कोणताही हक्क प्रस्थापित करता येणार नाही,

२. प्रथम नेमणूकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवासभत्ता अगर इतर कोणत्याही प्रकारची सवलत मिळणार नाही,

३. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम ११ परिशिष्ट ३ मध्ये नमुद केल्यानुसार सदर पदावर रुजू झाल्याचे दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत जिल्हा शल्य चिकित्सक अहमदनगर यांचेकडील शारिरीकदृष्टया पात्रतेसंबंधीचे वैद्यकिय प्रमाणपत्र नेमणूकीचे कार्यालयास सादर केले पाहीजे.वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न केल्यास अथवा वैद्यकीयदृष्टया शासकीय सेवेस अपात्र ठरल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता आपली नियुक्ती संपुष्टात आणणेत येईल याची नोंद घ्यावी.

४. महाराष्ट्र शासन साप्रवि कडील शा.नि.क्र.चारित्र्य-२०१७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ दिनांक २८.०८.२०१७ अन्वये संबधित उमेदवारांनी नियुक्तीनंतर सहा महिन्याचे आत पोलीसांकडील चारित्र्य पडताळणी केली असलेबाबतचा

अनुकुल अहवाल या कार्यालयास सादर करावा.सदर चारीत्र्यबाबतचा अहवाल सहा महिन्याच्या आत संबधित कार्यालयाकडून प्राप्त न झाल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता आपली नियुक्ती संपुष्टात आणणेत येईल याची नोद घ्यावी.

५. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधरण शर्ती ) (सुधारणा ) नियम २०२१ नुसार उमेदवाराने नियुक्तीचे वेळी खात्रीशीर कागदपत्री पुराव्यासह जन्मतारीख घोषीत करील.जेव्हा नियुक्तांची विहित शैक्षणिक अर्हता ही माध्यमिक शालांत परीक्षा किंवा त्यावरील असेल, अशा बाबतीत,माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्र हे वैध दस्तऐवज असल्याचे मानण्यात येईल. त्यानुसार उमेदवार जन्मतारखेचे परिशिष्ट पाच मध्ये अ मध्ये हमीपत्र देईल त्यानंतर खंड बी मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या दिनांकपासून एक वर्षाच्या कालावधीतनंतर अर्ज स्वीकारणेत येणार नाही.

६. नेमणुकीच्या पदावरुन स्थायी झालेनंतरच आंतरजिल्हा बदली करावयाची झाल्यास त्यासाठी शा.नि. दि. २९/०९/२०११ मधील तरतुदीच्या व प्रचलित शासन निर्णयाच्या अधीन राहुन कार्यवाही करण्यात येईल.

७. आपण जिल्हा परिषद कार्यक्षेत्रात कोठेही बदलीस पात्र रहाल.तसेच महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील दिनांक ५ जुलै २००८ चे शासन परिपत्रकानुसार नियुक्तीच्या ठिकाणी राहाणे बंधनकारक राहील, न राहील्यास शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र ठराल याची नोंद घ्यावी.

८. खात्याच्या पूर्व परवानगीशिवाय तुम्हांस कोणतेही प्रशिक्षण अगर शिक्षण घेता येणार नाही.

९.उमेदवाराने खाली दिलेल्या नमुन्यांत प्रतिज्ञापत्रक भरुन ज्या कार्यालयात नेमणूक करण्यात आली आहे. त्या संबंधित अधिका-याकडे द्यावी लागेल. मी श्री. ------------ रा.------------ प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, जिल्हा परिषद सेवेत माझी जिल्हा सेवा वर्ग-३ **कनिष्ठ सहाय्यक (लेखा) गट क** या पदावर झालेली नियुक्ती ही **वेतनबँण्ड (एस-६) १९९००-६३२००** यामध्ये पूर्णपणे हंगामी स्वरुपाची असून ती कोणतेही कारण अथवा नोटीस न देता संपविण्याचा जिल्हा परिषदेला पूर्ण अधिकार असून त्या अटीवर मी ही नेमणूक स्वीकारत आहे.

१०.सदर पदावर रुजू झालेचे दिनांकापासून ३ महिन्याचे आत महाराष्ट्र जि.प.जि.सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम १७ आणि शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र वशिअ/-१२१४/प्रक्र २६/११, दिनांक ०२/०६/२०१४ नुसार विहीत केलेले मत्ता व दायित्व (असेटस अॅड लायबीलीटीज) या बाबतचे विवरणपत्र भरुन देण्यात यावे.

११.सदर पदावर रुजू झालेनंतर जर काही अपरिहार्य कारणास्तव नोकरीचा राजीनामा दयावयाचा असेल तर यांनी एक महिना अगोदर तशी नोटीस देणे आवश्यक आहे. व नोटीस देणे शक्य नसेल तर नोटीसीपोटी एक महिन्याचे मुळ वेतन शासनाकडे भरावे लागेल.

१२. सदरचा आदेश मिळाल्यापासून ३० दिवसाचे आत नेमणुकीचे ठिकाणी हजर व्हावे. मुदतीत हजर न झाल्यास नोकरीची गरज नाही असे गृहीत धरुन नियुक्ती आपोआप रद्द झालेचे समजणेत येईल.

१३. कार्यालयात सदर प्रकरणी देणेत/पुरविणेत आलेली माहिती/कागदपत्रे व प्रतिज्ञापत्रे याआधारे आपणास नियुक्ती देण्यात येत आहे.यातील मजकुर खोटे असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची नेमणुक ही रद्द करुन खोटे कागदपत्रे/ प्रतिज्ञापत्र करुन दिल्याबाबत संबधिताविरुध्द नियमानुसार कारवाई करणेत येईल.

१४.सेवेत हजर झालेनंतर जिल्हा परिषद सेवा प्रवेशोत्तर परिक्षा हि परीक्षा ४ वर्षात ३ संधी मध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.तसेच तसेच तदनंतर लेखा लिपिक ही परीक्षा दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे अन्यथा आपली सेवा जेष्ठता गमावली जाईल.

१५. जि. प. सेवेत असतांना अगर रजेच्या मुदतीत कोणताही व्यवसाय,धंदा,अगर इतरत्र नोकरी करता येणार नाही.

१६.कार्यालय प्रमुखांना खालील नामनिर्देशनपत्र देण्यात यावीत. (१) गट विमा योजना (२) वैद्यकीय दाखला (३) जातीचा दाखला (४) जातीचे वैधता प्रमाणपत्र (५) स्वग्राम घोषणा पत्र (६) शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र पैकी अ.क्रं. ४ चे जात वैधता प्रमाणपत्र सेवेत दाखल झालेपासुन सहा महिन्यात सादर करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन आपली नियुक्ती करण्यात येत आहे. अन्यथा आपली नियुक्ती रद्द केली जाईल.

१७.उमेदवाराने शासनाने विहित केलेली संगणक परीक्षा (एमएस-सीआयटी),हि परीक्षा हजर झाल्याच्या दिनांकापासून दोन वर्षांत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा हा कालावधी संपताच उमेदवाराची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्यानुसार खातेप्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी सदर कर्मचाऱ्यास कार्यमुक्त करावे.

१८.महा.शासन सा.प्र.वि.परि.क्रं.एसआरव्ही-२०००/ प्र.क्रं.१७/२०००/१२ दि. ०१/०७/२००५ अन्वये दोन पेक्षा अधिक मुले असणाऱ्या उमेदवारांना शासन सेवेत नियुक्ती देण्यात प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नियुक्त्यासाठी अधीसुचनेत विहित केलेली लहान कुटुंबाची अतिरिक्त अट लागु झालेली आहे.सदर नियमानुसार दि.२८/०३/२००५ नंतर तिसरे अपत्य असणाऱ्या उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१९.आपण मागासवर्गीय असल्यास शासन निर्णय दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार आपणास नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत जात पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा आपली नियुक्ती रदद करण्यात येईल. तरी सदर पदावर रुजू होताच जात वैधता तपासणी करण्यासाठीचा प्रस्ताव संबधित जात पडताळणी समितीकडे सादर करुन त्याबाबतची पोहोच पावतीची साक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिका-यास सादर करावी. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास आपणास देण्यात

आलेली नियुक्ती कोणतीही पुर्व सूचना न देता रदद करण्यात येईल तसेच महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती,भटक्या जमाती , इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम २००० तरतुदीनुसार पुढील कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२०. ज्या मागासवर्गीय उमेदवारांची निवड खुल्या प्रवर्गातून झालेली आहे अशा उमेदवारांनाही त्यांच्या जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, सदर उमेदवारांसाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेसाठी विशिष्ट कालमर्यादा असणार नाही.

२१.शासन पा.पु.व स्वच्छता विभाग यांचे कडील शा.नि. क्रं घभाभ-१००५/प्र.क्र.४६३/पापु-१६ दि. ८/०६/२००६ अन्वये शासकीय कर्मचारी व अधिकारी यांना शौचालयाचा वापर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्या नुसार संबंधित कार्यालय प्रमुख यांनी उमेदवाराकडुन शौचालय असले बाबत व त्याचा वापर करत असले बाबत स्वयंघोषित प्रमाणपत्र एक महिन्याचे आत घ्यावे. ज्यांच्याकडे शौचालयाची सुविधा नाही अथवा जे उमेदवार शौचालयाचा वापर करीत नाहीत त्यांचा घरभाडे भत्ता थांबविण्यात येईल.

२२.महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडील शा.नि.क्रं अनियो-२०१५/प्र.क्र.-६२/वित्त-५, दि. १३ जून २०१७ राष्ट्रिय निवृत्ती वेतन योजना लागु ठरेल. मात्र सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महा.नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अशंराशीकरण) नियम १९८४ आणी सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण / जिल्हा परिषद भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही.

२३.महा.शा.वित्त.वि.,शा.नि.क्र.रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४/,दिनांक ३१ मार्च २०२३ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना/राष्ट्रीय निवृत्ती प्रणाली अंतर्गत कर्मचा-यांचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्यांच्या कुंटुंबियांना कुंटुंब निवृत्ती वेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवा निवृत्त झालेल्या कर्मचा-याला रुग्णता निवृत्ती वेतन आणि सेवानिवृत्ती उपदान तसेच शासन सेवेतून निवृत्त कर्मचा-यांना सेवा निवृत्ती उपदान लागू होईल त्याकरीता आपण शासन सेवेत नियुक्त झाल्यावर आठ दिवसाच्या आत विकल्प कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

२४. तुम्ही विवाहित असल्यास तुम्हास एकच पती / पत्नी आहे, असे समजण्यांत येईल, एकापेक्षा अधिक पती / पत्नी आढळून आल्यास तुमची सेवा तत्काळ समाप्त करण्यांत येईल.

२५.सदर नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपणास महाराष्ट्र जि.प.जिल्हा सेवा नियम (सर्व) व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन अधिसुचना/ निर्णय / परिपत्रक यामधील तसेच वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी देतील अशा सर्व निर्देशांचे तंतोतंत पालन करणे आपणांस बंधनकारक राहील.

२६.प्रस्तुत निवड प्रकरणी न्यायालयीन बाब उदभवल्यास त्याबाबत मा.न्यायालयाच्या निर्देशानुसार नियुक्ती प्राधिकरणाने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

वरील सर्व नोंदी खाते प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी संबधीत कर्मचा-यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेण्यात याव्यात. तसेच उपरोक्त अटी व शर्तींची देखील काटेकोर पालन व पुर्तता करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्र. २०२५०५१७०५००५२ असा आहे.

( आनंद भंडारी भाप्रसे )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

**श्रीमती दिक्षा सिध्दार्थ तेलतुंबडे, c/o ताराचंद गझलवार,सुनिता बिल्डिंग जवळ, संकटमोचन रोड, यवतमाळ ता.जि.यवतमाळ पीन.४४५००१**

प्रत-मा.अध्यक्ष,जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, **अहिल्यानगर** यांना माहितीस्तव स.सादर

प्रत -उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद **अहिल्यानगर,**

प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद **अहिल्यानगर**

प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी, ता.राहुरी,जि.अहिल्यानगर

२/- संबधित नियुक्त उमेदवारास नियमानुसार हजर करुन घेणेबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी. तसेच संबधिताच्या सर्व मुळ कागदपत्रांची पडताळणी करावी व तदनंतरच संबधितास रिक्त पदावर हजर करुन घ्यावे. संबधितांचा रुजू अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

(आनंद भंडारी भाप्रसे )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर